MHRT080006872021

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ४१/२०२१मधील निशाणी क्र. ६३ खालील आदेश**

१. वादीनी सदरचा दावा नमुद केलेली रक्कम रुपये ९०,०००/- ही रक्कम प्रतिवादी क्र. १ ते १५ यांच्याकडून वसुल होवून मिळावी याकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला दि.११/१०/२०२२ रोजीचा "कैफियत नाहीचा" आदेश रद्द करण्यात यावा याकरीता केलेला आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १ याचा वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र. १ च्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ बरेच दिवस आजारी असल्यामुळे व त्यानंतर आजारपणातुन बरे झाल्यानंतर या प्रकरणी आवश्यक कागदपत्रे मिळविण्यासाठी अडचण निर्माण झाल्यामुळे कागदपत्रे वेळेत मिळू शकले नाहीत. सबब प्रतिवादीला कैफियत वेळेत देता आली नाही. यामागे कोणताही गैरहेतु नव्हता. सबब प्रतिवादी क्र. १ विरुध्द झालेला कैफियत नाहीचा आदेश रद्द करण्यात येवून प्रतिवादीला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती प्रतिवादीच्या वकीलांनी केली.

३. वादीच्या वकीलांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले. वादीच्या वकीलांनी असे कथन केले आहे की आजारपणाबाबत कोणताही पुरावा प्रतिवादीने दाखल केलेला नाही. कागदपत्राबद्दल देखील मोघम उल्लेख आहे. विनाकैफियत आदेश पारीत झाल्यानंतर वादीने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिले. तदनंतर काही दिवसांनी वादीची जबानी देखील पूर्ण झाली.सबब प्रतिवादीचा पुरावा दाखल करण्याच्या स्टेजला प्रतिवादी विनाकैफियत आदेश सुमारे १० महिन्यानंतर विलंबाने दाखल करीत आहेत. अर्जातील कथने अतिशय खोटी व खोडसाळ आहेत. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा. अगर अर्ज मंजूर करण्याचे मत झाल्यास वादीना योग्य ती खर्चाची रक्कम प्रतिवादीकडून देण्यात यावी अशी विनंती केली.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.08.04 18:14:25 +0530

४. अर्ज पाहिला. अर्जातील कथने पाहिली. प्रस्तुतचा दावा रक्कम वसुलीकरीता दाखल आहे. याकामी प्रतिवादी क्र. १ यांना दि. ३०/०६/२०२२ रोजी समन्स प्राप्त झाले त्यानुसार दि. ३०/०६/२०२२ रोजी त्यांनी वकीलपत्र व कैफियत मुदतीचा अर्ज दिला. तदनंतर प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द दि. ११/१०/२०२२ रोजी मुदतीत कैफियत दाखल न केल्याने अर्ज नामंजूर करण्यात आला व विनाकैफियतीचा आदेश पारीत झाला. दि. १९/०६/२०२३ रोजी प्रतिवादी क्र. १ ने विनाकैफियत आदेश रद्दबातल करणेबाबत अर्ज केला. प्रतिवादी क्र. १ यांनी अर्जामध्ये नमुद केलेली कथने निश्चीतच संयुक्तीक आहेत. मात्र झालेला विलंब हा देखील ब-याच कालावधीचा असल्याने योग्य त्या खर्चाच्या रक्कमेसह तो मंजूर होण्यास पात्र आहे. सबब प्रतिवादी क्र. १ यांना त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देवून निश्चीतच दाव्याच्या अंतिम गुणदोषापर्यंत पोहण्यास फायदाच होणर आहे. शिवाय वादीला त्याचे कथन मांडण्याची संधी दाव्यादरम्यान दिली जाणरच आहे. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नि. ६३ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी वादीना आजच्या अथवा पुढील तारखेस रक्कम रुपये ५००/- देणेच्या अटीवर प्रतिवादी क्र.१ विरुध्द झालेला विनाकैफियतचा आदेश रद्द करणेत येतो.

३. प्रतिवादी क्र. १ यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर कैफियत त्वरीत दाखल करावी व दाखल केलेली असल्यास ती वाचून दाखल करावी.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.08.04 18:14:30 +0530

**(श्रुती ह. पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**

**दि. ०४/०८/२०२३**

**CERTIFICATE**

order in R.C.S. No.41-2021 Exh.63

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | T. N. Khade (Jr. Clerk) |
| Court name | : | Jt. Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 04/08/2023 |
| Order signed by the presiding officer on | : | 04/08/2023 |
| Order uploaded on | : | 04/08/2023 |